MHKO100011382020

**नि.दि.दावा क्र.९४/२०२० मधील निशाणी क्र. ७८ वरील आदेश**

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं.१ श्री.संभाजी केरबा देसाई हे दिनांक २३/०७/२०२५ रोजी कोल्हापूर येथे मयत झाले असून त्याची नोंद ग्रामपंचायत नेसरी, ता.गडहिंग्लज यांचे दफतरी दाखल नसलेने तसेच वादी वयोवृद्ध असल्याने त्यांचा मृत्युदाखला वादी यांना उपलब्ध करून घेणे अडचणीचे झाले आहे. सबब, प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांनी प्रतिवादी क्र.१ यांचा मृत्युदाखला न्यायालयात हजर करणेबाबत योग्य तो आदेश व्हावा.

२. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास त्याच अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, अर्जातील कारणे चुकीची आहेत. मृत्यु नोंद दाखला हा सरकारी कागद आहे व तो कोणासही उपलब्ध होतो. वादी ही प्रतिवादीच्या खांद्यावर बंदुक ठेवून काम करू इच्छीत आहे. या कारणाने अर्ज नामंजूर करावा.

३. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील व म्हणणेतील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

४. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन, कब्जा व अज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी तर्फे म्हणणे दाखल करताना प्रतिवादी

क्र.१ दिनांक २३/०७/२०२५ रोजी कोल्हापूर येथे मयत झाला नाही असे कथन करण्यात आले नाही. प्रतिवादी नं.१ चे वारस वादींनी अभिलेखावर घेतले नाहीत, त्यामुळे त्यांना प्रतिवादी नं.१ चा मृत्युदाखला हजर करणेबाबत आदेश करता येणार नाही. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहेत.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.05.05 18:08:58 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०५/०५/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर
गडहिंग्लज.